# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, लातूर

दुरध्वनी क्र.-(०२३८२)२३८२)२५८९६९ E-mail ID :-dyceogenlatur@gmail.com

---

दि.१८.०७.२०२२

## सुचना

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र. रानिआ/जिपपंस-२०२२/प्रक्र११/का-७ दि.०६.०७.२०२२ अन्वये जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांच्या निवडणूकींसाठी जिल्हा परिषद निवडणूक विभागनिहाय व पंचायत समिती निर्वाचक गण निहाय मतदार यादी तयार करण्यासाठी सुचित केले आहे.

त्यानुसार मा.आयोगाने अधिसुचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधान सभेच्या मतदार यादीवरून जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकीकरिता तयार केलेली प्रारूप मतदार यादी दि.१८.०७.२०२२ रोजी जिल्हा परिषदेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करण्यांत आली आहे. सदरील प्रारुप मतदार यादी सामान्य प्रशासन विभाग, जि.प.लातूर येथे पाहण्यासाठी उपलब्ध आहे. सदर मतदार यादी संदर्भात हरकती व सुचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक २२.०७.२०२२ असा असुन सदरील हरकती व सुचना संबंधित तहसिल कार्यालय अथवा जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे विहित कालावधीत दाखल करता येतील.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, लातूर**